# पेरुवाल्याची पोर

प्रकाशित:

१. गृहलक्ष्मी जुलै २०१३
२. अन्नपूर्णा मासिक जुन २०१२.

रत्नाकर वाणी

पुनरारंभ

© पुनरारंभ

website: http://www.rajratna.co.in Email: ratnakar.wani@rajratna.co.in

# पेरूवाल्याची पोर

सायली आणि शेवंता दोघी जिवा भावाच्या मैत्रीणी. सायली एक मध्यम वर्गीय घराण्यातील. तिचे वडिल एका सरकारी कार्यालयात अधिक्षक. तर शेवंताची घरची परिस्थिती बेताचीच तिच्या वडिलांचा पेरू विकण्याचा व्यवसाय. दोघी अभ्यासात हुषार. बारावीचे परिक्षेत उत्तम गुण मिळवून देखिल शेवंता नाराज दिसत होती. तिची नाराजी पाहून सायली ने विचारले,

"काय गं ! काय झाले एवढी उदास का? अजून जास्त गुण मिळायला हवे होते का ?"

" नाही गं तसं नाही " शेवंता म्हणाली.

" मग अशी उदास का? काही बोलत नाही. काही अडचण आहे का?" सायलीने प्रतिप्रश्न केला.

" नाही गं काही नाही " शेवंता म्हणाली.

" अगं मैत्रिण म्हणवतेस आणि सांगायला पण लाजतेस. काय परकी समजतेस मला? मन मोकळे कर. मी काही मदत करू शकली तर जरूर करेन" सायली आश्वासन देत म्हणाली.

असा दोघीतील हो नाहीचा संवाद १५ ते २0 मिनिटे चालू होता. अखेर शेवंता बोलती झाली.

" अगं, तुला माहीत आहे आमची आर्थिक परिस्थिती फार नाजूक आहे. माझ्या बाबांनी फळ विकी करून आजपर्यंत कसे बसे माझे १२ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. मध्येच आईला मधूमेह असल्याचे समजले. मी एकूलती एक असल्याने १२वी पर्यंत शिक्षण होउ शकले. आता आई पुढील शिक्षण घेण्याच्या विरोधात आहेत. बाबा काहीतरी विचार करू असे मोघम म्हणतात. मला अजून पुढे खूप शिकायची इच्छा आहे. वाणिज्य शाखेत पदवी घेईन म्हणते. जमल्यास पदव्युत्तर शिक्षण घेण्याचा पण इरादा आहे. पण परिस्थितीमुळे काहीच करता येत नाही. जर शिक्षण सोडले तर घरीच बसावे लागेल. फार तर एखाद्या दुकानात सेल्स गर्लची छोटीशी नोकरी करता येईल. पण मला ते नकोय गं. मला माझे करिअर बनवायचे आहे." इति शेवंता. हे सांगत असतांना तिच्या डोळयात अश्रू दाटून आले. तिचे दुःख ऐकून सायलीच्या डोळयाच्या कडा पण पाणावल्या.

डोळे पुसत सायली म्हणाली, "परिस्थिती विचार करण्या जोगी आहे. माणूस सर्व सोंग आणू शकतो पण पैशाचे सोंग आणू शकत नाही बघ. आणी असे झाले तर माझ्या शालेय जिवनात मी एका चांगल्या मैत्रिणी पासून वंचित होईन. आपण दोघी एकाच कॉलेजात जाउ. एकत्र अभ्यास करू. मैत्रिणी जमवू. अशी स्वप्ने मी रंगविली होती. सर्व विरली बघ."

"तरीपण काळजी करू नकोस. उद्या येईन मी तुझ्या घरी, तुझ्या आईची समजूत काढायला. मग तर झालं ! आता तरी हास व छानसे स्माईल दे! चल आपण रसवंतीमध्ये उसाचा रस घेउन तोंड गोड करू या म्हणजे तुझा मुड येईल." एवढे बोलून दोघींनी रसपान केले व आपापल्या घरची वाट धरली.

सायलीने सर्व हकिकत घरी आईस सांगितली. एक हुषार व होतकरू मुलगी शिक्षणापासून वंचित राहणार म्हणून तिला पण वाईट वाटले. पण करणार काय.

रात्री जेपणाच्या वेळी सायलीला कोणत्या कॉलेजात प्रवेश घ्यावा हा विषय चर्चेत आला. त्यावेळी सहजच म्हणून सायलीने शेवंताची कहाणी तिच्या बाबांना सांगितली व म्हणाली, "आपण काही या बाबतीत करू शकतो काय ?"

"सध्या या घडीला काहीच करू शकत नाही. बघू पुढे." बाबा म्हणाले.

दुपारी शेवंता घरातच होती. तिची आई नुकतीच कामे आटोपून झोपली होती.

" येऊ का घरात ?"

हे शब्द कानी पडताच शेवंताचे लक्ष दाराकडे गेले. दारात सायलीला पाहून म्हणाली.

"अगं ये ना! येऊ का काय विचारतेस ? "शेवंता म्हणाली.

सायलीचा आवाज ऐकून शेवंताचे आईस जाग आली व उठत म्हणाली,

"कोण, सायली तू?"

थोडयाशा गप्पा झाल्यावर सायलीने विषयास हात घातला.

" मावशी, शेपंतास कोणत्या कॉलेजमध्ये ॲडमिशन घेणार."

"आता कुठले आले कॉलेज अन काय पोरी"

शेवंताची आई हताशपणे सुस्कारा सोडत म्हणाली.

"असे का हो म्हणता? असे काय झाले की, तिचे शिक्षण अपुरे ठेवावे लागते?"

सायली म्हणाली.

" अगं पोरी तुला काय सांगू आणि कसं सांगू हेच कळेना बघ" शेवंताची आई म्हणाली.

आज पर्यंत शिकली तेच पुष्कळ झाले. आमच्या डोक्यावरून पाणी गेले गं बाई.तु जाणतेच कॉलेज म्हटले की, देणगी, फी, पुस्तके, ड्रेस वगैरे आले. यासाठी पैसा लागणार. यांचा फळ विकीचा व्यवसाय. हातावरचे पोट. दिवसाकाठी खूप फिरल्यावर, कसे तरी शे-दोनशे रूपये मिळतात. त्यातच माल आणायचा, घर खर्च पण करायचा, भरीस भर माझे आजारपण, मग सांग हिचे शिक्षण कसे शक्य आहे? उगाच अर्थवट शिकण्या पेक्षा न शिकलेली बरी. शिवाय आमचे समाजात शिकलेल्या मुलीचे लग्न जमविणे कठिण जाते बघ. मुले एवढी शिकलेली नसतात.

"त्यापेक्षा फार तर एखाद दुसरा छोटा मोठा कोर्स करून व्यवसायाला लागणे किंवा लग्न जमेपर्यंत नोकरी करून घरास हातभार लावावा असे वाटते गं बाई. परिस्थितीमुळे तिचे शिक्षण अपुरे

राहते याची आम्हाला देखिल खंत वाटते गं! पण काय करणार? "एवढे बोलत परत एकदा मोठा सुस्कारा सोडला.

यावर सायलीकडे काहीच उत्तर नव्हते. तरीपण स्वतःची बाजू सावरीत सायली म्हणाली.

"मावशी, हे सर्व खरंय. पण मी म्हणते, मुलीच्या शिक्षणासाठी शासनाच्या काही योजना आहेत त्याचा फायदा का घेऊ नये? मुली शिकल्या तर संसाराला तिचा हातभार लागतो. प्रसंगी शिक्षणाचा फायदा घेत ती स्वतःचे पायावर उभी राहू शकते."

"तुझे म्हणणे खरंय पोरी. पण शासनाकडून मदत मिळवायची म्हणजे कागद पत्रांची पुर्तता करणेत दिवस जातात. लाच दिल्याशिवाय कामे होत नाही. ऑफिसला हेलपाटे मारण्यातच दिवस जातात. एक दिवस गेला म्हणजे त्या दिवशी चूल बंद याची कल्पना नाही तुला पोरी" शेवंताची आई जड अंतःकरणाने म्हणाली.

यावर सायलीजवळ काहीच उत्तर नव्हते.

"तरीपण प्रयत्न करायला काय हरकत आहे. प्रयत्नांती परमेश्वर. आज ना उद्या कधीतरी यश येणारच. आशा करण्यात काय हरकत आहे. उद्याच्या आशेवरच माणूस जगतो ना! बघते मी माझ्या बाबांना पण सांगून" सायली म्हणाली.

तिचा आत्मविश्वास पाहून शेवंताची आईकडून कौतुकोदगार निघाले.

" हुषार आहेस गं पोरी. ऐकणार आहेस थोडीच."

शेवंता शांतपणे सर्व ऐकत होती. बोलणे झाल्यावर सायली जाण्यास निघाली. तिला निरोप देण्यास ती रस्त्यापर्यंत आली.

"परत ये गं ऽऽ पोरी." शेवंताच्या आईने आवाज दिला.

सदाशिवरावांना शेवंतास शासनाकडून मदत मिळविण्यात अपयश आले. पण एका स्वयंसेवी संस्थेकडून मदत मिळविण्यात यशस्वी झाले. शेवंता व सायलीला एकाच कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला. पुनश्च दोघींचे कॉलेज व अभ्यास नित नियमितपणे सुरू झाला.

शनिवारचा दिवस. दुपारी अडीच तीनची वेळ. सायली व शेवंता दोघी सायलीचे घरी अभ्यास करित होत्या. सदाशिवराव आराम करित होते तर आई घरकामात मग्न होती. तोच कानावर आरोळी ऐकू आली.

पेरू घ्या पेरू ऽऽऽ गोड पेरू ऽऽऽ कलमी पेरू ऽऽऽ.

सायलीने बाहेर येउन पेरूवाल्यास साद दिली.

" ओ पेरूवाले काका इकडे या !"

साधारण ५0शीच्या आसपासचा डोळयात जाड भिंगाचा चष्मा, पांढरी टोपी, पाढरा पूर्ण बाहीचा शर्ट, वर खोचलेले एक टांगी पांढरे धोतर, पायात चामडी वाहाणा असा पेहराव केलेला इसम सायकल

सह हजर झाला. सायकलच्या मागील कॅरेजला उथळ टोपलीत गवत आंथरून पेरू रचलेले होते. सायकलच्या हॅंडलला एका बाजूस काटा अडकवलेला तर दुर्सया बाजूस प्लॅस्टिकच्या पिशवीत पेरू व वजनाची मापे तसेच जेवणाचा डबा होता.

सायली नेहमीप्रमाणे म्हणाली “आज चार पेरू द्या”.

शेवंता सायली चे मागोमाग बाहेर आली. पेरूवाल्यास पाहून म्हणाली

“ बाबा तुम्ही ! ”

पेरूवाल्याचा प्रतिप्रश्न “सई, पोरी तु इकडे कोठे आलीस आज? ”

दोघांमधील संवाद ऐकून सायली चकित झाली व म्हणाली

“तुम्ही दोघे एकमेकास ओळखतात ?”

“ होय पोरी. ही माझी एकुलती एक मुलगी शेवंता. हिला आम्ही घरी सई म्हणतो ” पेरूवाला उत्तरला.

एव्हाना सायलीचे आई बाबा पण बाहेर आले. शेवंता आपल्या वडिलांना त्यांची ओळख करून देत म्हणाली.

“ बाबा ही माझी मैत्रीण सायली, हे सायलीचे बाबा व आई. ही आपल्याकडे आली होती त्यावेळी तुम्ही घरी नव्हता.”

सदाशिवराव व शेवंताचे बाबा यांच्या गप्पा चालू असतांनाच शेवंताचे लक्ष सायकलला अडकविलेल्या पिशवी कडे गेले. पिशवीतील जेवणाचा डबा जसा चा तसा पाहून शेवंता म्हणाली.

“हे हो काय बाबा, अजून डबा खाल्ला नाही? आता तीन वाजलेत, जेवणाची वेळ टळून गेली. उपाशीच फिरताय चक्कर येतील ना ! ”

“ खाइन आता. नेहमीची एक दोन गि-हाईक झाल्यावर जेवणारच आहे. उपाशी थोडीच राहणार.”शेवंताचे बाबां म्हणाले.

“थांबा, आता जेवण करूनच जा. आम्हा सर्वांची पण जेवणे राहीलीत अजून. मी वरण भात लावते व भाजी गरम करते. ”सायलीची आई म्हणाली.

नाही नाही म्हणता त्यांचा आग्रह त्यांना मोडवेना. जेवणे आटोपून शेवंताचे बाबा जायला निघणार त्यावेळी सायलीने पेरूचे पैसे देउ केले. ते नाकारत शेवंताचे बाबा म्हणाले.

“राहू दे पोरी. माझ्या पोरीच्या शिक्षणासाठी झटणा-या मोठया मनाच्या माणसांपेक्षा पैसा मोठा नाही. अशा थोर माणसाची ओळख झाली ती काय कमि झाली.”

शेवंताचे बाबा भावनावशतेने बोलून गेले. कळत न कळत त्यांच्या डोळयांच्या कडा पाणावल्या. धोतराच्या सोग्याने डोळे पुसत निरोप घेत म्हणाले.

“ निघतो मी अजून बराच माल अडलाय पाटीत. सई पोरी लवकर जा घरी. तुझी आई वाट बघत असेल.”

शिक्षण पूर्ण होत असतांनाच शेवंतासाठी वर संशोधन सुरू असल्याचे सदाशिवरावांना समजले. त्यांच्या कार्यालयात नुकताच विनायक काळे नावाचा हुषार, होतकरू, विवाहेच्छु सुस्वभावी तरूण रूजू झाला होता. विनायक एका गरिब शेतकरी कुटुंबातुन पुढे आलेला. त्यांना हे स्थळ शेवंतासाठी योग्य वाटले.

एक दिवस विनायकचा रजेचा अर्ज टेबलावर आलेला पाहून म्हणाले, "काही खास कार्यक्रम आहे वाटत. लाडू खाउ घालण्याचा विचार दिसतोय." सदाशिवरावांनी गमतीशीर विचारले.

" हं, होय न न नाही सर. आजीची प्रकृति ठिक नाही म्हणून भेटून यावे म्हणतो. " विनायकने बिचकत उत्तर दिले.

" काय होय काय नाही. आजीच्या आजारपणाचे नुसते कारण आहे." सदाशिवराव म्हणाले.

"नाही सर, तसे काही नाही." विनायक सारवासारव करित म्हणाला.

"बरं तुझे आई वडिल कोठे आहेत?" सदाशिवराव मुद्याला हात घालत म्हणाले .

"सर ते कालच येथे आलेत. आहेत खोलीवर."इति विनायक.

"उद्या संध्याकाळी घेऊन येशील त्यांना माझ्या घरी भेटायला. तेवढीच ओळख." सदाशिवराव म्हणाले.

"होय सर, सांगतो मी त्यांना." इति विनायक.

ठरल्या प्रमाणे संध्याकाळी विनायक त्याचे आई वडिलांसह आला. ओळख, गप्पा टप्पा, चहापाणी झाल्यावर सदाशिवरावांनी विनायकचे लग्नाचा विषय काढला व शेवंताची माहिती देत प्रस्ताव पुढे मांडला. होय नाही करता करता दुसरे दिवशी मुलगी पाहण्याचा कार्यक्रम पार पडला. दोन्ही पक्ष समविचारी लाभल्यामुळे, आठवडया भरातच दोहोबाजूंचा होकार आला व यथावकाश विवाह सोहळा आनंदात पार पडला.

महिन्या भरातच विनायकचे निमंत्रणावरून सदाशिवराव, त्यांची पत्नी व शेवंताचे आई वडील पूजेचे निमित्ताने त्यांचे घरी गेले. शेवंताने आधीच सदाशिवरावांचे आवडीचा पेरूचा मुरंबा केला होता. जेवणे आटोपल्यावर सदाशिवरावांनी सहजच शेवंताचे सासूला प्रश्न केला.

" काय कशी आहे आमची शेवंता? "

शेवंताचे सासू कडून त्वरेने उत्तर आले.

" पेरूवाल्याची पोर ती, पेरूच्या फोडे सारखीच गोड आहे. "